MHLA140038562023

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३७६/२०२४ मधील नि.१ खालील आदेश</u>**

**(रेखा बलभिम कांबळे विरुध्द पोपट श्रीपती रसाळ )**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरुध्द भा.द.वि. चे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दाखल केलेला आहे. आज रोजी फिर्यादी यांचा वारंवार पुकारा करून देखील गैरहजर आहे. फिर्यादीतर्फे प्रकरण तहकुबीचा अर्ज नाही. ब-याच तारखांपासून फिर्यादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. फिर्याद ही दि. ०८.१२.२०२३ रोजी दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरण हे खारीज करण्यासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर देखील फिर्यादी हजर झाले नाहीत. आज रोजी अभिलेखावर तहकुबीचा कोणताही अर्ज दाखल नाही. यावरून असे दिसून येते की, फिर्यादी ही प्रस्तूतचे प्रकरण चालवू इच्छीत नाही. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

सं.फौ.ख.क्र.३७६/२०२४ हा खटला अर्जदाराने पुर्तता न केल्यामुळे काढुन टाकण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.08 17:30:42 +0530

औसा. (एस. डी. साबळे)

दिनांकः– ०८/०७/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, औसा.